# 'मेट्रो-३'च्या दिनदर्शिकेत जेजेच्या विद्यार्थ्यांची चित्रे



प्रतिनिधी
मुंबई

मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनच्या २०१९ दिनदर्शिकेमध्ये जेजे स्कूल ऑफ आर्टच्या विद्यार्थ्यांनी रेखाटलेली चित्रे झळकणार आहेत.

आगामी वर्षाची दिनदर्शिका सर्वोत्तम असावी, यासाठी एमएमआरसीने 'मुंबई मेट्रो ३ च्या कामकाजाचा आढावा दर्शवणारी चित्रे' या संकल्पनेअंतर्गत जेजे स्कूल ऑफ आर्ट्सच्या विद्यार्थ्यांसह एमएमआरसीच्या मुख्य कार्यालयात १० डिसेंबर रोजी चित्रप्रदर्शन आयोजित केले होते. मुंबई मेट्रो-३च्या सर्व पॅकेजची एकूण २० चित्रे या प्रदर्शनात पहायला मिळाली. या कार्यक्रमाला एमएमआरसीच्या व्यवस्थापकीय संचालक अश्विनी भिडे यांच्यासह अन्य मान्यवरांनी हजेरी लावली होती. मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनच्या २०१९ दिनदर्शिकेमध्ये काही आकर्षक चित्रे पहायला मिळणार आहेत. या उपक्रमात सहभागी झालेल्या जेजे स्कूल ऑफ आर्ट्समधील १० विद्यार्थ्यांपैकी ९ विद्यार्थी हे चित्रकार तर एक विद्यार्थी शिल्पकार आहे. या विद्यार्थ्यांनी मुंबई मेट्रो-३ च्या कामाचा आढावा घेणारी चित्रे कॅनव्हासवर हुबेहूब मांडली होती. विद्यार्थ्यांनी स्वत: मेट्रोच्या स्टेशनची पाहणीकरून त्यानंतर आपली कला कॅनव्हासवर उतरवल्यामुळे चित्रांमध्ये वास्तवात आली होती. एकूण १८ पैकी ६ चित्रांची निवड परीक्षक प्रभाकर कोलते, अभय सरदेसाई आणि अंजली गुप्ते यांनी केली. ही सर्वोत्तम ६ चित्रे २०१९ च्या मुंबई मेट्रो-३ दिनदर्शिकेमध्ये झळकणार आहेत.

> या विद्यार्थ्यांची कला आणि त्यातून व्यक्त होणारी अचूकता अविश्वसनीय आहे. त्यांनी मेट्रो-३ च्या कामाचा आढावा इतक्या सहजतेने घेतला आहे हे खऱ्या अर्थाने कौतुकास्पद आहे.
>
> -अश्विनी भिडे, व्यवस्थापकीय संचालक, एमएमआरसी